(02)



JAWAHAR EDUCATION SOCIETY'S

# VAIDYANATH COLLEGE,

## PARLI-VAIJNATH. DIST : BEED. (MS) 431515.

(Affiliated to Dr.Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad)

NATIONAL SEMINAR ON

## SOCIAL REFORM AND PRESENT STATUS OF RAJARSHI SHAHU MAHARAJ

Organised By : Department of History and Sociology

Tuesday, 7 March, 2017

# CERTIFICATE

This is to certify that Dr./~~Mr.~~/~~Mrs.~~ Shinde B. R.

has ~~participated~~ / ~~chaired a session~~ / presented a paper titled

" शाहू महाराजांची आरक्षण विषयक भूमिका ".

in a National Seminar at Vaidyanath College, Parli Vaijnath. Dist:Beed.

on Tuesday, 7th March 2017.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

| Dr. B. K. Shep | Prof. R. D. Rathod | Dr. R. K. Ippar |
|---|---|---|
| Organising Secretary | Organising Secretary | Principal |

dwarka digital

## छ.शाहु महाराजाची आरक्षण विषयक भुमीक

भारतात अनेक संस्थान होती. त्या पैकी कोल्हापुर महाराष्ट्रातील एक महत्वपुर्ण संस्थान होते.भारतात हिन्दु धर्मात वेगवेगळयाजाती व धर्माचे लोक राहातात.त्यामध्ये उच्च निच्चता मोठया प्रमाणावर आढळून येते. हिंदू धर्मात एकुण चार भागात मानसाच्या जातीचे असे.ऐवढेच नव्हेतर हे लोक रस्त्यावरून फिरताांना दिसल्या नंतर अपशकुण मानले जात.अशी पध्दत हिंदू धर्मात असतानाच कोल्हापुर संस्थानात छत्रपती शाहु माहाराजाच्यां रूपानी एक उगवता सुर्य मानवता वादी मानव समाजात समता निर्माण करणारा एकोणीसाव्या शतकाच्या उत्तारार्धत व विसाव्या शतकाच्या पुर्वाधात उदयास आला.त्यानी अस्पृश्य सामाजाच्या च्या उनतीसाठी मुहूर्त मेढ रोवली.भारतातील अनेकसंस्थानच्या इतिहासात कोणत्याही राजाने सामाजिक पुनर्ररचनेचे कार्य केले नाही ते कार्य छत्रपती शाहु महाराज यांनी १९०२ ला हाती घेतले व अस्पृश्यांना सामाजिक समता निर्माण करून देण्यासाठी शाहु महाराजांनी सामाजिक आर्थिक व शैक्षणिक समता निर्माण करून देण्याच्या कार्यास १९०२ ला गुरूवात केली.

### शिक्षण विषयक शाहु महाराजांची भुमीका.

छत्रपती शाहु महाराजांची अस्पृश्या विषयी शिक्षण विषयक भुमीका अतिशय महत्वाची होती.कारण शिक्षणा शिवाय त्यांना समानता मिळणार नाही.हे शाहु महाराजाना माहित होते.परंतु हिंन्दु धर्मात ब्राम्हाणा शिवाय शिक्षणाचा अधिकार कोणत्याही दुस-या जातीला नव्हता ते अधिकार कोल्हापुर संस्थानात छत्रपती शाहु राज्यांनी मिळवुण दिला अस्पृश्य हे सामाजिक तर मागसलेले होतेच त्याच वरोवर ते आर्थिक मागसलेले होते.त्यामुळे त्या शिक्षणाचे केवळ अधीकार देवुन चालणार नाही तर त्यांना शिक्षणासाठी आर्थिक सोयी सुध्दा उपलब्ध करून देणे आवश्यक होते म्हणुन राजानी त्यांना शिक्षणासाठी आर्थिक ५0% आरक्षण मिळवून दिले जे या देशात कोणत्याही राज्यांनी कार्य केले नाही ते महाराजानी करून दाखवले देशातील इतर संस्थानिकाना आपल्या राज्यात कोणत्याही सुधारणा नको होत्या पण राजानी कोल्हापुर संस्थानात सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणा केल्या त्याला इतिहासामध्ये तोड नाही.

छत्रपती शाहु ना अस्पृश्या विषयी प्रचंळ तळमळ होती त्याच्या विषयी आदर घेता मानवी जन्माला घातलेल्या प्रत्येकमानसाला समाजामध्ये माना सन्मानाने जगता आले पाहिजे अशी त्यांची भुमिका होती.त्यासाठी शिक्षण हेच महत्वाचे हत्यार आहे हे राजाच्या लक्षात आले म्हणून त्यांनी सर्वप्रथम सुधारणा घडवुन आणण्यासाठी त्यानी शैक्षणिक संस्थान पासुन शाहु महाराजाची अस्पृश्या विषयी शिक्षणा विषयी जागृती निर्माण करण्यास सुरूवात केली त्यासाठी भास्कर जाधव,महादेव डोंगरे, श्रीपतराव शिंदे, गणपतराव कदम यांची नियुक्ती केली.१९०८ साली कोल्हापुरात मिस क्लार्क हॉस्टेल सुरू केले. त्यांनी या वसतिगृहास पाच हजार रूपये देणगी दिली.त्याच वरोवर त्यानी विद्याप्रसारक मंडळ नावाची स्थापणा केली मंडळाचे प्रमुख म्हणून भास्कराव जाधव यांनी काम पाहीले.

शाहु महाराजाना जात पात मान्य नव्हती परंतु भारतात हिंदु धर्मात जातीचा पगडा येवढा होता की त्यांना महार,त्यांना सामाजीक कार्यची सुरुवात कशी करावी हा प्रश्न सतावत आशा म्हणुन शाहु महाराजानि स्वांतत्र वतिगृह काढले.

इ.स.१८९४साली संस्थानात अस्पृश्यांसाठी ५शाळा होत्या. त्यात विद्यार्थाची संख्या १६८ होती त्यावरून शाहु महाराजानीज्या विशेष सोयी सवलती उपलब्ध करून दिल्या अस्पृश्यामध्ये शिक्षण प्रसार करण्यासाठी जे परिश्रम घेतले त्याचाच परिणाम अस्पृश्यानमध्ये शैक्षणिक प्रगती झालेली दिसुन येते.शाहु महाराज येवढयावर थांवले नाही तर त्यांनी अस्पृश्य समाजात प्रसार करण्यासाठी वटहुकुम काढले त्यात संस्थाना मध्ये चाभांर, महार, मांग, ढोर या अस्पृश्य लोकांन साठी एक रात्रीची शाळा होती.ती शाळा त्याच्या या हुकुमाद्वरे ती शाळा चालु ठेवली आणि त्याच वरोवर ४ ऑक्टोवर १९०७ च्या एका आदेशानुसार कोल्हापुरातील चाभांर व ढोर या अस्पृश्य समाजातील मुलींसाठी एक शाळाा काढण्यात आली व त्या शाळेसाठी ९६ रूपये अनुदान मिळावे अशी सोय केली.

आणि अस्पृश्याना शिक्षणाच्या सोयी मिळवुन दिल्या त्यामुळे अस्पृश्याच्या मुला मध्ये शैक्षणिक प्रगती दिसुन येत होती म्हणुन शाहु महाराज म्हणाले अस्पृश्याच्या मुलामध्ये शिक्षणाची पात्रता आहे . परंतु त्यांची स्थिती दारिद्रयाची आसल्याने त्यांना शिक्षण घेण्यास व-याच अडचणी येत होत्या त्यासाठी त्यानी वस्तीग्रहाची सोय करण्यात आली या निर्णयाचा हुकूम ५ /३ /१९०९ रोजी काढण्यात आला . त्याच बरोबर त्यांना शैक्षणिक सुविधा मोफत मिळाव्यात म्हणुन २४ नोव्हेंबर १९११ रोजी निर्णय घेण्यात आला त्यात त्यांना मोफत शिक्षण व शिष्यवृत्या देण्याचे काम केले त्याच बरोबर अस्पृश्य विद्यार्याना १९१९ च्या हुकूमा व्दारे पाटया पुस्तके पेन्सील
देण्यासाठी २५०० रू मंजुर केले . अस्पृश्य लोकांना शिक्षण घेण्यासाठी उत्तेजन दिले

अस्पृश्यांना नौकरीत आरक्षण

शाहु महाराजांनी अस्पृश्याना शैक्षणिक सवलती सोबत नौकरीत शुध्दा संधी मिळावी म्हणुन त्यांनी कुलकर्णी वतने नष्ट केली व त्याजागी खेडयाचा कारभार पाहण्यासाठी तलाठी या वर्गाची निर्मिती केली . यात अस्पृश्यांना संधी मिळावी म्हणुन महाराजानी तलाठी वर्गातील विद्यार्थांना दर महा आठ रूपये प्रमाणे खास शिष्यवृत्या जाहीर केल्या अस्पृश्य जातीमधील गुणवंत विद्यार्थाना मोठया अधिकाराच्या व मानांच्या जागा दिल्या आणि इतरांना त्यापासुन प्रेरणा मिळेल आणि त्याच्यात सुधारणा होई ल या हेतुने १० ऑगस्ट १९१८ रोजी एक आदेश जारी केला त्या आदेशात त्याना तलाठी या पदावर नेमण्यासाठी हुकूम दिला . त्याच बरोबर जे लोक शिक्षण घेवुन व स्वत: च्या कर्तवगारीने पुढे येतील त्यांना कारकून व अवल प्रकारच्या जागा देण्यात याव्यात अशी त्याची अज्ञा होती ऐवढयावरच शाहु महाराज थांवले नाहीत तर त्यांनी अस्पृश्याना मानाच्या व अधिकाराच्या जागा देण्याचे धोरण स्विकारले त्यात महसुल न्याय, पोलिस व जनरल अशा खात्याच्या प्रमुख पदी नेमण्यात यईल

शाहु महाराज व भटक्या जातीचे आरक्षण:

शाहु महाराजांचे आरक्षण विषयक महार माग चांभार यांच्यासाठी तर आरक्षणाच्या सुविधा दिल्याच पण त्याच बरोबर भटक्या जातीच्या लोकांन साठी शुध्दा शाहु महाराजानी आरक्षणाचे धोरण राबविले सध्या महाराष्ट्रात भटक्या विमुक्त जातीची एकुण संख्या ४२ आहे त्यात २८ भटक्या तर१४ विमुक्त जाती आहेत . या जाती कधीच स्थिर नव्हत्या त्या सतत फिरत राहातात त्याची एक वेगळी रूढी व परंपरा असायची . त्याच बरोबर त्याच्या जात पंचायती असत . न्याय निवाडयांचे काम जात पंचायत करत असत या जाती आपली दैनंदिन जिवन जगण्यासाठी चो-या, दरोडे ,लुटालुट करत असत . या लोकांना गुन्हेगार म्हणुन घोषीत केले . ब्रिटिशानी १८२७ च्या आदेशानुसार भटक्या जातीच्या फिरण्यावर बंदी घातली व त्यांच्यावर पोलीस पाटलाने नजर टेवावी असे सांगितले

या लोकांना ब्रिटिशानी खुला तुरूंगवास दिला मुळात तो महाराजाना आवडला नाही . शाहु महाराजानी त्याच्याकडे मानतावादी दृष्टीकोणातुन पाहीले व त्यांना स्थिर करण्यासाठी त्याना राहण्यासाठी जागा दिल्या त्याच्या साठी शाळा काढल्या त्यांना वेगवेगळया जाती साठी हॉस्टेल काढली म्हणून शाहू महाराजाचा कोणत्याही जातीत जन्म झाला तरी त्यांनी महाराष्टातील सर्व जाती चा उदार करण्यासाठी आपळले आयुष्य घातले


संदर्भ सुची :-

छत्रपती शाहू महाराज : गौवरव विशेष अंक २१०

छत्रपती शाहू महाराज : जैसिंगराव पवार

छत्रपती शाहू महाराज एक उदार व्यक्तीमत्व : विनायक गोपाळकर

छत्रपती शाहू महाराज आणि आरक्षण विषयक धोरण : प्रा . महेश तुमडे


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

06

Hanuman Shikshan Prasarak Mandal, Sonpeth's

**Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth, Dist. Parbhani**

&

Rameshwar Shikshan Prasarak Mandal, Sonpeth's

**Shri Panditguru Pardikar Mahavidyalaya, Sirsala Tq. Parli (V). Dist. Beed.**

Jointly Organized ICSSR Sponsored

**National Interdisciplinary Multi lingual Seminar on**

# Women Safety: Challenges and Remedies

( 22nd July 2017 )

# Certificate

This is to certify that Dr. /~~Mr.~~ /~~Mrs.~~ Shinde B. R.

of Late Ramesh Warpudkar ACS College, Sonpeth

attended the ICSSR Sponsored '**National Interdisciplinary Multi lingual Seminar on Women Safety: Challenges and Remedies**' jointly organized by Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth, Dist. Parbhani and Shri Panditguru Pardikar Mahavidyalaya, Sirsala, Dist. Beed on 22 July 2017. His / Her role was as a participant / invited lecturer / paper presenter /chair person / organizing committee member.

The topic of the lecture / paper was ..........

Principal
Dr V D Satpute

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

Principal
Dr [illegible] Be[illegible]e

Date: 22 July 2017

# उद्योगात स्त्री कामगार कल्यानासंबंधी उपाययोजना

Lata P ... Sonpeth Ta.Sonpeth Dist.Parbhani Pin-431516

प्रा.डॉ.बी.आर.शिंदे
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ ता.सोनपेठ जि.परभणी

उद्योगात किंवा उत्पान करणा–यासंस्थामध्ये काम करणा–या स्त्री कामगारांच्या हितासाठी आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी भारत सरकारची उपाय योजना तयार केल्या आहेत. उद्योगात काम करणा–या स्त्री कामगाराचे आरोग्य निट राहावे, काम करतांना त्यांना सुरक्षितता मिळावी त्यासाठी त्यांना कल्याणकारी सोयी उपलब्ध व्हाव्यात. स्त्री कामगारांच्या कामाचे तास निश्चित असावेत त्यांना रजा, पगारी रजा चा मुख्य उदेशासाठी भारत सरकानी स्त्री कामगारांसाठी कारखाना आधीनियम १९४८ हा तयार केला हया कायद्यातील स्त्री कामगार विषयक उपया योजना या लेखात आल्यासल्या आहेत त्या उपाय योजना व नियम आपणांस खालीलप्रमाणे अभ्यासता येतील.

## स्त्री कामगार कल्याणासंबंधीचे उपाय व नियम:

१. कलम ४२ मध्ये स्त्री कामगारांना अंग व कपडे धुण्याी योग्य सोय असावी कारण स्त्री कामगारांच्या वस्तीत त्यांची घरे व घरांची गर्दी असल्यामुळे स्त्री कामगारांना त्यांच्या घरांमध्ये सोयी उपलब्ध नसतात. म्हणुन स्त्री कामगारांसाठी स्नानग्रहाची व्यवस्था कारखाण्यामध्येच करण्यासंबंधी या कायद्यात तरतुद केल्या आहेत या सोयीमुळे स्त्री कामगारांचे आरोग्य व कार्यक्षमता चांगली राहावी त्याची अनेक फायदे स्त्री कामगारासोबत उद्योगाच्या मालकांना सुध्दा होतात या संबंधी सरकारने योग्य ते तयार करणे व स्नानग्रहाचे प्रमाण, त्यांचा दर्जा व सोयी या संबंधीची काळजी घेतली पाहिजे.

२. भारत सरकारने कलम ४३ मध्ये धुतलेले कपडे वाळविण्या करीता आणि कामाच्या वेळेत जे कपडे स्त्री कामगार घालत नाहीत ते कपडे ठेवण्या करीता योग्य त्या सोयीचा

कलमानुसार राज्य सरकार करू शकते. त्या नुसार स्त्री कामगारासाठी कारखाण्यात व्यवस्था करावी लागेल.

३. स्त्री कामगारांना कारखाण्यात काम करतांना यंत्राजवळ सतत उभे राहुन काम करावे लागते अशा कामगारांना यंत्राजवळ सतत उभे राहुन काम करावे लागते अशा स्त्री कामगारांना काम करतांना संधी मिळताच बसता यावे यासाठी योग्य ती व्यवस्था असली पाहिजे कारण काम करतांना स्त्री कामगारांची कार्यक्षमता कमी होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

४. कारखाण्यात प्रथमोपचारासाठी साधने उपलब्ध असली पाहिजे कलम ४५ त्यासाठी कारखाण्यात स्त्री पुरूष मिळून १५० कामगारामागे एक या प्रमाणात प्रथमोपचार पेटया किंवा कपाटे असली पाहिजे त्यात पुरूषांपेक्षा स्त्री कामगाराच्या आजाराच्या समस्या वेगळया असतात त्या त्यासाठी कारखानदारांनी त्याची योग्य ती काळजी घेतली पाहीजे. प्रथमोपचाराच्या पेटया प्रथमोपचाराचे प्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तीच्या ताब्या असले पाहीजे कारखाण्यात स्त्री पुरूष मिळून ५०० पेक्षा जास्त कामगार कामावर असतील अशा कारखाण्यात साधने आणि औषधे असलेला सुश्रूशा कक्ष असला पाहिजे. हा कक्ष निर्धारीत योग्यतेच्या वैद्यकिय अधिका–याच्या नियंत्रणाखाली चालविला पाहीजे आणि त्यासाइी स्वतंत्र कर्मचारी वर्ग नेमला पाहीजे.

५. कारखाण्यात २५० पेक्षा जास्त स्त्री व पुरूष कामगार असतील अशा कारखाण्यात कामगारांसाठी निर्धारीत पध्दतीचे एक अथवा अधिक उपहारगृहे असावीत. उपहारगृह सूरू करण्याची तारीख, त्याची बांधणी वत्या ठिकाणी मिळणारे पदार्थ व पेये, त्याचा दर्जा व किंतमी त्याचे व्यवस्थापन आणि कामगाराचे प्रतिनीधी ई राज्य सरकार सविस्तर नियम तयार करू शकतात.

६. कारखाण्यात २५० पेक्षा जास्त स्त्री व पुरूष आहेत अशा कारखाण्यात भोजनगृह आणि विश्रांतीगृह सीन असले पाहीजे कलम ४७ ती व्यवस्थान स्त्रीसाठी वेगळी असली पाहीजे सोबत आणलेला डबा खाण्याची व्यवस्था असली पाहिजे त्या ठिकाणी भरपुर

प्रकाश व हवा असली पाहीजे. पिण्याच्या पाण्याची सोय असली पाहीजे भोजनगृह व विश्रांती साठीची जागा स्वच्छव थंड असावी कारखाण्यात भोजनगृह असल्यास कारखाण्यात इतर कोणत्याही ठिकाणी भोजन घेता येणार नाही जेथे स्वतंत्र भोजनगृह नेसल पण उपहारगृह असेल तेथे भोजन घेण्यासाइी उपहारगृहाचा उपयोग करता येईल.

७. कारखाण्यात ५० पेक्षा जास्त कामगार कामावर आहेत त्या कारखाण्यात स्त्री कामगारांच्या सहा वर्षाखालील मुलांना एक शिशुगृहे असली पाहिजे कलम ४८ त्यात खेळी हवा प्रकाश भरपुर असला पाहिजे तसेच ती स्वच्छ आणि आरोग्यपूर्ण असली पहिजे शिशूगृहात बाल संगोपणाचे प्रशिक्षण घेतलेलया अनुभवी स्त्री कर्मचा–यांच्या देखरेखीखाली असली पाहिजे विनामुल्य दुधाची आणि उपहाराची सोय शिशूगृहात असीव आपल्या लहान मुलांच्या भुकेची व्यवस्था करण्यासाठी संबंधीत स्त्री कामगारांना सवलत मिळेल.

८. कारखाण्यात ५०० पेक्षा जास्त स्त्री आणि पूरूष काम करतात अशा कारखाण्यात कामगार कल्याण अधिकारी असावा कलम ४९ अशा अधिका–यांची पात्रता, नोकरीच्या अटी, त्यांचे अधिकार, कर्तव्ये वगैरे राज्य सरकार ठरवून देईल.

९. <u>समारोप</u> :–

भारत सरकारने कारखाण्यात काम करणा–या स्त्री कामगार कल्याणासंबंधी योग्य योजना राबवून त्यांच्या आरोग्याची व कल्याणासंबंधी योग्य उपाय योजना करण्यासाठी योग्य नियम केले पाहीजे व सरकाने केलेल्या उपाययोजना योग्य राबवण्यासाठी त्यावर देखरेख ठेवली पाहीजे कारण कारखाण्यात काम करणारा स्त्री कामगार हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे त्यांची योग्य ती काळजी घेतली पाहीजे.

संदर्भ :


१. डॉ.मेघा कानेटकर.

२. डॉ.विनायक द. पेंडारकर


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Babu Genu Shikshan Sanstha's

# LATE KISHANRAO RAMJI SHINDE COLLEGE,

## PARBHANI ( MAHARASHTRA )

**BCA, B.Sc.( CS ), B. Sc. ( SE ), B. Lib., M. Lib., & M.A. ( ECO )**

# Certificate

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

This is to certify that Mr./Ms/Dr./Prof. Shinde B. R of Late Ramesh Warpudkar college Sonpeth. has participated as registered Delegate/Inaugurator /Chief-Guest/ Chairperson/ Resource Person/ Key-Note Addressor in the National Level Inter-Disciplinary Seminar on " **Problems of Women in India: Challenges and Solutions** " sponsored by Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded and organized by the Post-Graduate Department of Economics of our college on 9th March, 2017 at Parbhani.

S(he) has/has not presented paper entitled भारतातील महिला समोरील समस्या : आव्हाने व उपाय.

| Dr. Digambar B. Rode | Kishan B. Shingare | Hon. Kamalbai B. Shinde |
|---|---|---|
| Organizing Secretary | Convener & I/C Principal | Secretary |

# भारतातील महिला समोरील समस्या : आव्हने व उपाय

प्रा.वी.आर.शिंदे
सहाय्यक प्राध्यापक
कै. रमेश वरपुडकर कॉलेज सोनपेठ

**प्रस्तावना:-**

भारतातील महिला व पुरुष यांच्या बाबत आम्यास केला असता अनेक आश्चर्यकारक गोष्टी पाहावयास मिळतात. महिलाना भारतीय पुरुषा प्रमाणे अधिकाराचा वापर करता येत नाही व त्यांना स्वतंत्र नाही. भारतामध्ये स्त्रिया आणि पुरुष यांच्या लिंगगुणोत्तर देखील समान नाही या मध्ये खुप मोठ्या प्रमाणावर तफावत पहावयास मिळते. त्याचे अनेक कारणे आहेत त्यामध्ये मुख्य म्हणजे स्त्रियाकडे पाहण्याचा द्रष्ट्रीकोण तसेच मुलीच्या लग्नांचा प्रश्न अशा अनेक कारणामुळे हे प्रमाण कमी असल्याचे आपनास पाहावयास मिळते. त्याच प्रमाणे स्त्रिया या समाजा मध्ये अनेक ठिकाणी सुरक्षीत पणे वावरु शकत नाही त्यांना अनेक बंधनाचे पालन करावे लागते. भारतासारख्या देशा समोर स्त्रियांच्या सुरक्षीततेची एक फार मोठी समस्या निर्माण झाली आहे. या व या सारख्या अनेक समस्यावर उपाय शोधण्यासाठी शासन अनेक उपाय योजना शोधत आहे. या उपाय योजना शोधुन त्यांची प्रबळपणे आमलबजावनी करणे गरजेचे आहे. या मध्ये बाल विवाह हि एक गंभीर समस्या आहे त्यामुळे १८ वर्षच्या आधीच बाल अवस्थेतच अनेक मुलींना आई व बाळ यांची जबाबदारी पेलावी लागत आहे. तसेच औद्योगीक व सेवाक्षेत्रामध्ये स्त्रियांना अनेक समस्याना समोरे जावे लागत आहे.

भारतीय स्त्रिया समोर अनेक क्षेत्रामध्ये करिअर करण्याच्या संधी उपलब्ध आहेत तसेच त्या क्षेत्र मध्ये करिअर करण्यासाठी त्याच्या समोर खुप मोठ-मोठी आव्हाने देखील आहेत. त्या अव्हाणाना तोंड देण्यासाठी भारतीय महिलाना तशा स्वरुपाची मदत किंवा प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

**उदिष्ट्ये:-**

१. महिलाच्या समस्याचा शोध घेणे.
२. भारतीय महिलाच्या समस्यावर उपाय सुचविणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनात प्रामुख्याने दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आलेला असून, त्यामध्ये संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्रकाशित व अप्रकाशित, लिखान, वृर्तमानपत्रे, साप्ताहीके, मासिके, वेगवेगळे अहवाल इंटरनेट इत्यादी उपलब्ध स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

**भारतीय महिला समोरिल समस्या :-**

**१. हुंडा:-**

भारतामध्ये लग्न कार्यमध्ये खुप मोठ्या प्रमाणावर लग्नामध्ये हुंडा घेतला व दिला जातो. लग्न म्हणटले की मुलीच्या वडीलांना खुप मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. त्या लग्नामध्ये हुंडा दयावा लागतो तसेच हुंडयासोबत इतरही वस्तु व साहित्य द्यावे लागतात महिलाची स्वता: कामवण्याची शक्ती नसल्यामुळे किंवा त्या तशा प्रकारे पात्र नसल्यामुळे महिला या बहुतांश प्रमाणात पुरुषावर व त्यांच्या कमईवर अंवलंबुल असतात. लग्न करते वेळी मुंलीची इच्छा जास्त प्रमाणात विचारात घेतली जात नाही. तसेच त्यांना कोणत्याही प्रकाचा निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आलेला नाही.

२. बालविवाह:-

भारतातील ब-याच राज्यामध्ये खुप मोठया प्रमाणावर बाल विवाह होतात. शासनाने ठरवुन दिलेल्या वया पेक्षा कमी वय असतांना केलेला विवाह म्हणजे बाल विवाह या साठी मुलाचे वय २१ वर्षे असले पहिजे व मुलींचे १८ वर्षे वय असावे अशी नियमावली शासनाने तयार केली आहे. परंतु बरेच लोक मुलींचे लगणाचे वय पुर्ण होण्या अधीच त्यांचे लग्न लाउन देतात. त्यामुळे खुप मुलीना लहान वयातच पत्नी व आई यांची जबाबदारी पार पाडावी लागते.

३. शिक्षण वय:-

मुलगी व मुलगा यांच्या मध्ये लग्नच्या वयाचा फरक असल्यामुळे मुलीला शिक्षणासाठी जास्त वेळ मिळत नाही मुलींना जास्तीत जास्त मुली या १२ वी पर्यंत शिक्षण घेतात त्यापुढे पदवीचे शिक्षण सुरु असताना लग्न करुन दिले जात त्यामुळे शिक्षणासाठी पुरेशा वेळ मिळत नाही.

४. गर्भपात आणि स्त्रीभ्रूण हत्या:-

भारतामध्ये स्त्रीच्या जन्माला कही प्रमाणात विरोध केला जात असल्यामुळे भारतीय महिलासमोर गर्भपात करणे हे कायद्याने गुन्हा आहे. हे माहित असुन देखील खुप मोठया प्रमाणावर आज भारतात गर्भपात होत आहेत ही एक भारतीय स्त्रीया पुढील समस्या आहे. स्त्रीला इच्छा नसतानाही सासर कडील व्यक्ती किंवा पती यांच्या महन्यानुसार गर्भापात करावा लागतो. याचे मुख्य कारण म्हणजे स्त्रीयाकडे पाहण्याची दुष्ट्री, तसेच स्त्रीला मिळणारी वागणूक या मुख्या करणामुळे तसेच अशिक्षीत पणामुळे खुप मोठया प्रनाणावर गर्भपात होत आहेत.

५. घरगुती हिंसा:-

भारताचा विचार करता सुमारे ६० ते ७०% टक्के महिला या घरगुती हिसंला बळी पडत आहेत. त्यामध्ये माहेर घरुन एखादी वस्तु किंवा मोटार गाडी घेऊन येण्यासाठी आग्रह घरला जातो किंवा पैसे घेऊन येण्यासाठी विवाहित महिलेला सासर मंडळी कडुन त्रास दिला जाते. या मध्ये वेगवेगळया स्वरुपाचा शारीरीक किंवा मानसीक स्वरुपाचा त्रास देण्यात येतो त्यांमुळे मोठया प्रमाणावर स्त्रीया आत्महात्या करतात. त्यांना आत्महत्या करण्यासाठी मजबुर केले जाते हे सर्व थांबबण्यासाठी शासणाचे विविध उपाय योजनाची अमलबजावणी व्यवस्थीत पध्दतीने करावी.

६. व्यवसाय क्षेत्र:-

भारतामध्ये व्यवसाय क्षेत्राची विकास विस्तार होत आहे. त्याप्रमाणे नवनविन व्यवसाय आस्तीत्वात येत आहेत या ठिकाणी त्यांना व्यवसाय करण्याची तसेच नैकरी करण्याची संधी मिळत आहे. व्यवसाय करते वेळी भारतीय महिला समोर अनेक समस्या निर्माण होत आहेत तसेच भारतामध्ये महिलासाठी नैकरी करण्यासाठी वातावरण हे चांगल्या स्वरुपाचे नाही नैकरी करणा-या महिलाकडे समाजाचा बघणचा द्रष्ट्रीकोण हा तितका चांगला नाही. भारतामध्ये एक जुनी म्हण आहे ती अशी की महिलानी फक्त चुल व मुल इतकेच पाहावे. या मुळे महिलांचा पाहिजे त्या स्वरूपाचा विकास झालेला नाही. अनेक क्षेत्र हे महिलासाठी उपलब्ध होत आहेत. व त्यांना या क्षेत्र मध्ये नैकरीच्या संधी आहेत तरी भारत सरकारने व समाजा त्यांच्या प्रती द्रष्ट्रीकोण बदलुन त्यांना स्वत:चा विकास करण्याची संधी द्यावी.

७. लैंगिक अत्याचार:-

जगात कोणत्याही किंवा प्रत्येक देशातच जवळपास महिला म्हणजे उपभोगाची वस्तु समजले जाते. त्यामुळे महिला कडे बघण्याचा समाजाचा दृष्ट्रीकोण चांगला नाही त्यांना वाईट हेतुने समाजातील

काही लोक बघतात. त्यामुळे भारतात लैंगिक अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे. या मध्ये दिवसा दिवसाला वाढ होत चालली आहे. त्यांचे कारण हि भारत सरकाचे कायदे व सुव्यावस्था हे आहे तसेच समाजातील शिक्षणाचे प्रमाण व विचार करण्याची क्षमता हे मुख्य कारण सांगता येतील. बलात्कारी पुरूषाला गुन्हा सिध्द झाल्यानंतर ७ वर्षेची शिक्षा न देता सरळ फासावर चढविले पाहीजे किंवा त्यांच्या शरिराचे काही महत्वपुर्ण अवयव जसे की दोन्ही हात व पाय कापुन त्याला सोडावे ज्यामुळे समाजामध्ये एक भिती निर्माण होईल व त्यापुढे समाज अशा स्वरुपाचे वाईट व अधोरी कृत्य करणार नाही तसेच त्या व्यक्तीला शिक्षा झाली आहे ती अयुष्यभर केलेल्या गुन्ह्यांची शिक्षा भोगत असल्यामुळे कदाचीत त्याच्या कडे पाहुन समाजाची मानसीकता बदलु शकते. ज्या महिलावर अन्या अत्याचार झालेला आहे अशा महिलाची केस फॅस्ट ट्रॅक कोर्टमध्ये चालवून त्यांना त्वरीत न्याय द्यावा व त्यांना पुन्हा जिवन व्यतीत करण्यासाठी एखादे उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून द्यावे.

८. **असुरक्षित वाटणे:-**

भारतामध्ये महिला या स्वता:ला असूरक्षित समजतात. कारण या ठिकाणी सुरक्षा यंत्रणा मोठया प्रमाणात विकसीत झालेली किंवा विकसीत झाली नाही. असे मनावे लागेल आपल्या देशामध्ये महिलासाठी म्हणटले जाते की सातच्या आत घरात कारण महिला या रात्रीच्या वेळी मुक्तपणे संचार करू शकत नाही कारण या देशातील लोकाची महिलाकडे पाहण्याची दृष्ट्री बदलेली नाही त्यामुळे महिला स्वत:ला असुरक्षीत समजतात आज मोठया प्रमाणावर शिक्षणाच्या सुविधा गावागावापर्यंत पोहचल्या आहेत शिक्षण घेतल्यामुळे महिला या नवनविन क्षेत्रा मध्ये करीअर करू इच्छीता व करत आहेत परंतु हे करत असताना अनेक ठिकाणी महिलावर अन्याय अत्याचार झालेल्याची घटना एकण्यास मिळतात. त्यामुळे त्यांना कोणत्याही ठिकाणी महिला स्वत:ला सुरक्षित समजत नाहीत. व्यवसाय क्षेत्रात व नोकरीच्या ठिकाणी अनेक वेळा त्यांना त्यांच्या मालकांकडुन व सहकार्य कडून शारीरीक व मानसिक स्वरूपात छडले जाते. अशा परिस्थीतीत त्या महिला या गोष्टी आपल्या घरी मुक्त पणे सांगत नाहीत कारण जर सांगीतले तर नौकरी सोडावी लागेल त्यामुळे त्या हा अत्याचार निमुटपणे सहन करतात. तसेच काही स्त्रीया स्वत:वर झालेला अन्याय अत्याचार इतरांना किंवा कुंटुबातील व्यक्तीना सांगत नाहित कारण त्यांमुळे कुंटुबाची व स्वता:ची प्रतिमा समाजामध्ये मलीन होईल या भिती पोटी त्या गप्प बसतात.

**समारोप:-**

भारतातील महिला समोर अनेक समस्या आहेत तसेच त्यांच्या पुढे अनेक अव्हाने निर्माण होतात एखादी गोष्ट करण्याचे ठरविल्यास त्यांना ती गोष्ट करण्यासाठी कुंटुबाकडून व समाजाकडून योग्य असे स्वरूपाचे मार्गदर्शन मिळत नाही. तसेच त्यांना समाजातील व कुंटुबातील व्यक्ती कडून मदत देखील मिळत नाही त्यामुळे भारतीय महिलाचा राष्ट्रीय उत्पादनातील वाटा हा कमी आहे. त्यांच्या समोरील समस्यांचा उल्लेख या शोधनिबंधात केलेला आहे त्या समस्या सोडीविण्यासाठी शासनाने योग्य अशी उपाय योजना शोधून तीची योग्य पध्दतीने अमलबजावनी करावी ज्या मुळे स्त्रीयांना न्याय मिळेल व स्त्रीयांचे सबलीकरण होण्यास मदत होईल.

PRINCIPAL
Late Ramesh ... ACS
College, Sonpeth Dist. Parbhani

UGC New Delhi & S.R.T.M.U. Nanded Sponsored

One Day National Seminar

On

# "Impact of Demonetization on indian Society"

Organized by

## Dept.of Commerce

Digambarrao Bindu Arts & Commerce Collage,Bhokar Dist Nanded

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

# Certificate

This is to Certify that,Mr/~~Miss~~/Mrs/Dr SHINDE B. R.

From Late. Ramesh warpudkar college. sonpeth.

has participated in One Day National Seminar on **"Impact of Demonetization on indian Society"**

held on 23 rd Feb. 2017,& presented a paper entitled

IMPACT on DEMONETIZATION on FARMERS in MAHARASHTRA.

| | | | |
|---|---|---|---|
| Joint Organizer | Organizing Secretory | Co-Ordinator | Chief Organizer |
| Mr.Munde B.G. | Dr.Kharwadkar P.D. | Dr.Phole K.B. | Dr.Panjab Chavan |
| Head Dept.of Commerce | Dept.of Commerce | Dept.of Commerce | Principal |

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth Pin-431516
Sonpeth Dist. Parbhani

# Impact on Demonetization on farmer in Maharashtra

Dr. B. R. Shinde

Late. Ramesh Warpudkar

(ACS) Collage Sonpeth

Introduction:

Demonetization has a big impact on Indian market and citizens like you and me. People flocked the banks to changed their currency and stood in long lines in front of bank and ATMs for hours to draw their money also bank employees overworked with all their might so that each individual can take a sigh of relief. Surely, we have problems in but we also need to understand the importance of it. Just imagine if it was told a month ago, then all black money launderers could have managed their money in this or that form. That's why it has to be a sudden and surprise act.

People flocked the banks to changed their currency and stood in long lines in front of bank and ATMs for hours to draw their money also bank employees overworked with all their might so that each individual can take a sigh of relief. Surely, we have problems in but we also need to understand the importance of it. Just imagine if it was told a month ago, then all black money launderers could have managed their money in this or that form. That's why it has to be a sudden and surprise act.

Narendra Modi may have shocked the nation with his Nov. 8.2017 announcement, but the prime minister's move was hardly unprecedented. India has pulled select denominations of its currency twice before.

The first was when Rs1,000, Rs5,000, and Rs10,000 notes were taken out of in January 1946, a year and a half before the country won independence from the

Late Rameshwar Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516

British. The Rs10,000 notes were the largest currency denomination ever printed by the Reserve Bank of India, introduced for the first time in 1938. All three notes were reintroduced in 1954.

Then, in 1977, the Janata Party coalition government came into power. A year into the government's term, party leader Morarji Desai was more bullish about cracking down on counterfeits and black money. The High Denomination Bank Notes (Demonetisation) Act, instated by the ruling party on Jan. 16, 1978, deemed the Rs1,000, Rs5,000 and Rs10,000 notes illegal for the second time.
At the time, then-RBI governor I.G. Patel disagreed with the measure and accused the Janata coalition government of trying to cripple the corrupt predecessor governments instead of simply eradicating black money.

For the most part, Modi's measure mirrors Desai's—except this time, he has the backing of his RBI governor, Urjit Patel, who applauded Modi's "very bold step" addressing concerns about the "growing menace of fake Indian currency notes." But that doesn't mean all the skeptics are off his back. Economists doubt the impact of his decision.

Objectives of Study:

1) To study the concept of demonetization rupees.
2) To study the impact of demonetization on farmer in maharastra.

Research Merhodology:

The present study is purely based on secondary data which is collected by different internet readings books research papers, articles and related magazines.

Impact of demonetization:

1. Farmers were unable to purchase inputs like certified HYV seeds from market. They were using old seeds from the last year harvest and not

purchasing quality seeds from market. This will adversely affect crop yields despite good monsoon this year.

2. Farmers suffered a setback due to nationwide cash crunch and a collapse in the demand for vegetables in wholesale markets."Yes, the prices in the wholesale markets have crashed," an agriculture ministry official admitted but said any reports of farmers discarding produce was "sporadic" and that the crisis would resolve soon.
3. Fruit and vegetable farmers were badly hit. They need cash on daily basis to purchase inputs like pesticides, fertilizers and hired labour for harvest and also to transport and sell at urban centres. Lack of cash with farmers leading to less-than optimal use of inputs resulted in lower yields, reduced sales, higher wastage and lower price realization.
4. The small growers and retail vegetable sellers are bearing the brunt, as they are with inventories of perishable commodities.
5. Farm laborer are not paid with their wages to currency shortage and postponing of work is happening as farmers don't are not able to pay for the laborers .
6. Worst off are the farmers who take loans to buy raw material for growing crops.
7. Failure to get a legitimate price on their produce, will push many farmers undermassive debts, burdened by interests.
8. Small farmers are also suffering a cash-crunch due to demonetisation, as many have crops lying around, but with no buyers whatsoever.
9. Formal financing in many parts, especially Punjab, Uttar Pradesh, Odisha, Maharashtra, Gujarat and Kerala is significantly from cooperative banks, which are barred from exchange-deposit of demonetized currency.

10.Agriculture was impacted through the input-output channels as well as price and output feedback effects. Sale, transport, marketing and distribution of ready produce to wholesale centres or mandis, is dominantly cash-dependent. Disruptions, breaks in the supply chains feedback to farmers as sales fall, increased wastage of perishables, lower revenues that show up as trade dues instead of cash in hand and when credited into bank accounts with limited access affect the sector.

11.A significant portion of the farmers depend on bank credit for their cash needs.Banks only grant new loans, if farmer repay their existing ones. Farmers are unable to withdraw the required cash from their accounts, not to talk about getting crop loans. Of the targeted Rs 18,000 crore crop loan for Rabi, banks have disbursed over Rs 1,500 crore in October. No significant amount was released as crop loans after November 8, when Rs 500 and Rs 1,000 notes became obsolete.

Conclusion:

1) Indian economy is growing but with very poor ground
2) Rapidly demonetization of rupees creating trouble in economic growth.

Referance:


1) www.wikpedia.org
2) Lokmat time paper
3) Loksatta news paper



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth. Dist. Parbhani

महाराष्ट्र शिक्षण समिती संचलित

# महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

Indian Council of Social Science Research

निलंगा जि. लातूर

नॅक पुनर्मुल्यांकन B दर्जा, CGPA - २.६७

स्वा.रा.ती.म.विद्यापीठाचा उत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार प्राप्त

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन परिषद, नवी दिल्ली, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित,

एक दिवसीय आंतर विद्याशाखीय

## राष्ट्रीय चर्चासत्र

दि. २४ जून २०१७

## वर्तमान भारतीय परिस्थितीत महिलांचे सामाजिक-आर्थिक स्थान

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती/ डॉ. बी. आर. शिंदे - कै. रमेश वरपुडकर महा. सोनपेठ जि. परभणी यांनी "*वर्तमान भारतीय परिस्थितीत महिलांचे सामाजिक-आर्थिक स्थान*" या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात सत्राध्यक्ष / साधनव्यक्ती / शोध निबंधवाचक /सहभागी प्रतिनिधी / संशोधक विद्यार्थी म्हणून सक्रिय सहभाग नोंदविला आणि महिलांचे उद्योगात योगदान या शोध निबंधाचे वाचन केले/ योगदान दिले.

सबब प्रमाणपत्र देण्यात येते.

डॉ.एस.एस. दवनाळकर
संयोजन सचिव
(अर्थशास्त्र विभागप्रमुख)

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

डॉ. व्ही.एल. एरंडे
प्राचार्य
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

05

05

# उध्योगात महिलांनाचे योगदान

प्रा.डॉ.बी.आर.शिंदे

वाणिज्य विभाग

कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ.

**प्रस्तावना:-**

पूर्वी भारतीय पुरूष संस्कृती मानली जात असे. त्यामुळे महिकलांना दुय्यम स्थान होते. त्यांचे कार्य चूल आणि मुल ऐवढेच मर्यदित असे परंतु औध्यागिक क्रांती नंतर जगात मोठ्या प्रमाणात बदल झाला त्याचा परिणाम भारतात सुध्दा सर्व क्षेत्रात बदल झाला आणि स्त्री-पुरूष असा भेद न राहता त्यांच्यात महिला समानता निर्माण झाली आज सामाजिक राजकीय क्षेत्रात बरोबरीच औध्योगिक क्षेत्रात महत्तवाची भूमिका बजावत आहेत. पूर्वी उद्योग व्यवसायामध्ये महिलांचा वाटा अत्यंत अल्प होता. आज प्रत्येक क्षेत्रात महिला पुरूषांच्या बरोबरीने कार्य करीत असमन त्या औद्योगिक क्षेत्रात सुध्दा मागे नसल्याचे दिसून येत आहे. आज महिला लेडीज ब्युटी पार्लर, गृह उद्योग, हॉटेल, शिक्षण व माहिती तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रात महिला आपल्या सहभाग नोंदवताना दिसत आहेत.

आज २१ व्या शतकात अनेक महिला व्यवसाय उद्योगांमध्ये पुढाकार घेऊन काम करतात वेगवेगळ्या संधी शोधतात. धोका पत्करतात व व्यवस्थित उद्योगातचे कार्य पार पाडले जात आहेत. नॅशनल लेव्हलस्टॅडिंग कमिटी ऑन विमेन इंटरप्रणशिप १९९१ या समितीने महिला उद्योगाची व्याख्या केली आहे. त्या व्याख्येनुसार "ज्या व्यवसायात किंवा औद्योगिक उपकरणात ५१% भाग भांडवल गुंतवून ५०% रोजगार महिलांनाच देण्यात आला आहे. अशा व्यवसायास महिला उद्योग असे म्हणतात." अशा प्रकारची व्याख्या करण्यात आली. या व्याख्ये वरून आपणास असे म्हणता येते की महिला उद्योगाचे नेतृत्व एका महिलेकडे किंवा महिलांच्या गटाकडे असले पाहिजे. महिला उद्योजक बनविण्यासाठी आज भारत

सरकारने अनेक सोई व सुविधा निर्माण करून दिल्या आहेत. त्यामुळे अनेक आज यशस्वी महिला उद्योजक निर्माण झाल्या आहेत. त्यांनी व्यवसायिक उपकरणात आपले योगदान दिले आहे. हेमलता दिदी यशस्वी महिला उद्योजक यांचा अभ्यास करणार आहोत.

**यशस्वी हेमलता दिदी उद्योजक:-**

हेमलता दिदी या मध्यमवर्गीय कुटुंबात जन्माला आल्या. त्यांचे वडील कंपनीत काम करत होते. तर आई घरकाम करीत असतात. हेमलता दिदी या वडिलांच्या लाडक्या होत्या. हेमलता दिदी शाळेत सुध्दा हु शार होत्या. त्यांनी Msc पर्यंत शिक्षण घेतले. Msc पूर्ण झाल्या नंतर सुगंधी द्रव्य तयार करण्याचा करखाना काढण्याचा निश्चय केला होता. त्यांनी या उद्योगाला अर्थ साहाय्य मिळवण्यासाठी स्त्री शक्ती योजनेखाली प्रस्ताव दाखल करण्याची त्यांची योजना होती. परंतु वडिलांच्या निधनामुळे दिदीवर कुटुंबाची जबाबदारी पडली. त्यांच्या कुटुंबात एक बहिण व आई होत्या. त्यांच्या घरात भांडवलाचा अभाव होता. त्यांना उद्योग निर्माण करण्याची इच्छा असून शुध्दा ती पूर्ण करता आली नाही. तर त्यांना कुटुंबाचा सांभाळ करण्यासाठी एका शाळेत नोकरी करण्याचा निर्णय घ्यावा लागला. त्यांच्या आई शिवणकाम, स्वयंपाक, अशी कामे करू लागली. कालांतराने त्यांचे हळूहळू कुटुंब स्थिर होऊ लागताच दीदी च्या आईने दीदीला व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले. त्याच काळात "तांत्रिक शिक्षण, प्रशिक्षण घेतलेल्या विज्ञान शाखेतील अभ्यास केलेल्या..................पर्यंत अर्थ साठा कमी व्याज दराने उपलब्ध अशी एक जाहिरात त्यांच्या वाचनात आली. व त्या जाहिरातीत प्रकल्प अहवालासह भेअ असे त्यात सांगण्यात आले होते. त्या आपल्या कागदपत्रासह त्या संस्थेत दाखल झाल्या परंतु त्यांची जाहिरात वाचली होती. ती त्या नसून त्या संस्थेत कर्ज देण्याची व्यवस्था नव्हती म्हणून त्यांच्या दृष्टीने ती जाहिरात फसवी होती.

कारण ती संस्था ज्या पात्र व्यक्तीकडे स्वत:चे २५% भांडवल असावे व उर्वरित रक्कम कर्जरूपाने मिळावी असे त्यांना सांगण्यात आले त्यामुळे त्यांचा भ्रमनिरास झाल्या परंतु त्या खचल्या नाहीत. आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती

नाजूक असल्यामुळे कुटुंबाची जबाबदारी आपल्या खांदयावर घेऊन व आपल्या बौद्धिक व आपल्यात असलेल्या गुणांच्या जोरावर त्या पुन्हा कामाला लागल्या व त्यांनी आपल्या स्वत:चा व्यवसाय उभा करण्यास प्रयत्न केला.

दीदी ची आई गावात इतरांच्या घरी स्वयंपाकाचे काम करीत असता एके दिवशी त्यांची आई कुलकर्णी कडे स्वयंपाकाचे काम करण्यास साठी गेल्या होत्या. परंतु त्या दिवशी दिदी आपल्या आई कडून घराची च्यावी घेण्याची विसारल्या होत्या. त्या आईचा शोधा घेत कुलकर्णी यांचे घर शोधून काढले त्या कुलकर्णी यांच्या घरी गेल्या तेव्हा कुलकर्णी यांची पत्नी त्यांच्या घरचा टेलीफोन साफ करत होत्या. दीदीने त्यांचा हातातून तो कपडा घेत टेलीफोन साफ केल. तेव्हा कुलकर्णी बाईना त्यांनी साफ केलेला टेलिफोन फार आवडला तेव्हा कुलकर्णी यांच्या घरचा आणि कुलकर्णी साहेबांच्या ऑफिस मधील दोन टेलीफोन साफ करण्याचे काम दिले. त्यात त्याचा मोबदला म्हणून त्यांनी प्रति फोन मागे ५ रुपये दिले. त्यांना १५ रुपये महिना सुरु झाला.

तिने या संधीचा फायदा घेत टेलिफोन सफाईचे काम सुरू केले. त्यांनी त्या साठी १ सेंट ची बॉटली व फल्यनल चे कापड विकत घेतली. व त्यांनी अशा अल्पशा भांडवलावर व्यवसाय सुरु केला. दिदीने टेलिफोन साफ करण्यासाठी वापरलेले सुत्र काढण्याची पध्दत पाहून कुलकर्णी साहेब खुप खुश झाले. त्यांनी आपल्या अनेक मित्रांना दिदी बद्दल माहिती दिली. त्यामुळे तिला एक आठवड्यात ५०-६० टेलिफोनची कामे मिळाले. तिचे काम पाहून ग्राहक खुश झाले. पाहता पाहता तिला एका महिन्यात २०० टेलिफोन साफ करण्याचे काम मिळाले. तिचा व्यवसाय चांगला सुरु झाला. तिचे उत्पन्न महिन्याला १०० च्या आसपास सुरू झाले. त्या टेलिफोन सफाई मध्ये नामांकित झाल्या. त्यामुळे त्यांनी आपल्या घराच्या दारावर "टेलिफोन क्लिन सर्विसेस" असा बोर्ड लावला. पाहता पाहता त्यांच्याकडे ग्राहकांची संख्या ५०० वर गेली. तिच्या व्यवसायाचा व्याप वाढला. तिला एकटीला काम सांभाळणे अशक्य झाले. त्यामुळे त्यांनी हे काम व्यवस्थित व वेळेवर पूर्ण करण्यासाठी आपले सहाय्यक म्हणून कॉलेजची मुले कामावर घेतली. मुले टेलिफोन

साफ करण्याचे काम करत होते. तर दिदी सर्व कार्यालयाती बिलांची वसुली करत असे.

दिदीकडे ०६ महिन्याच्या काळात २००० टेलिफोन साफ करण्याचे काम तिला मिळाले. तिच्या उत्पन्नात चांगली वाढ झाली होती. तिने आपल्या स्वत:च्या घरी संपर्कासाठी टेलिफोन घेतला. तिला पाई फिरून फिरून व्यवसाय करने आता शक्य नव्हते. त्यामुळे ती गाडीने करू लागली. तिची चांगली प्रसिद्धी झाली. त्यामुळे क्वॉर्टर्स सफाई च्या कामाची विचारणा झाली. दिदींनी कसलाही विचार न करता काम स्विकारले. पाहता पाहता ३२ बंगल्यांच्या सफाईचे काम मिळाले. दिदींनी हे काम अतिशय उत्कृष्ट पद्धतीने केले. त्या बंगल्यातील अधिकाऱ्यांना ते काम आवडले. तिला दिवसेंदिवस या कामात यश मिळत होते. तिनं मुलां सोबतच २५-३० मुली सहाय्यक म्हणून काम करण्यासाठी सोबत घेतल्या. दिदीला या कार्यास सुरूवात करून ०३ वर्षे पूर्ण झाली होती. त्याचबरोबर कार्यालय वाचनालय बंगले असे अनेक काते तिच्या कर्तुत्वाने तिला मिळाली तिच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

दिदीनी या कामाबरोबरच पुरणपोळ्या पुरवठा करण्याचा ठेवा मिळाला हे काम एका कंपनीतील साहेब कडून मिळाले. हे काम जवळच्या १०-१२ महिलांकडून पुरण पोळ्या तयार करणे व त्यांची पॅकिंग करून पाठवणे असा व्यवसाय सुरू करण्यात आला.

हा व्यवसाय देशात व विदेशात सुरू झाला. या व्यवसायातून दिदीला चांगले उत्पन्न मिळण्यास सुरूवात झाली. त्याच बरोबर टेलिफोनचे उत्पन्न चालू होते. त्या अर्थाने दिदी स्वत:चा व्यवसाय तयार करण्यास तयार झाली.

**यशस्वी हेमलता दिदी:-**

दिदी स्वत:चा उद्योग निर्माण करण्यास तयार झाली तिने पहिल्या व्यवसायातून मिळालेल्या पैशातून औद्योगिक वसाहती उद्योग निर्माण करण्यासाठी स्वत:ची जागा विकत घेतीली. त्या जागेवर इमारत तयार करण्याचा नकाशा यंत्र

खरेदीची करण्याची तयारी केली. प्रकल्प अहवाल तयार केला. त्यांनी त्याच्या लघु उद्योगाची नोंदणी केली. सर्व कागदपत्र मिळाली. यंत्रसामग्री मागवली त्यांनी जवळचे ०४ तू ०५ लाख रूपयांची गुंतवणूक केली होती नंतर वित्तीय संस्थेचे अर्थ सहाय्य घेतले व उद्योग उभा केला.

**निष्कर्ष:-**

भारतात पुरूषप्रधान संस्कृती असली तरी प्राचीन काळापासून आपल्या संस्कृतीनुसार महिला आपल्या घरकाम शेती कार्य किंवा इतर कामे करत असतात. परंतु औद्योगिक क्रांतीनंतर पुरूषांबरोबरच महिलांच्या कार्यात विकास झाला. महिलासुद्धा घरकाम किंवा शेती काम सोबत इतर कार्य करू लागली. त्यांची उदाहरण म्हणून आपणास दिदीचे घेता येईल त्या टेलिफोन सफाई करण्यापासून ते स्वत:चा उद्योग बनवला. त्यांनी बनवलेले उत्पादन केलेल्या पुरणपोळ्या देशात नव्हे तर विदेशात शुद्धामागणी निर्माण झाली. त्याचा परिणाम आर्थिक उत्पादन वाढ झाली. यावरून आपणास एवढेच सांगता येते की महिलांचे सुद्धा पुरूषाबरोबर त्यांचे सुद्धा योगदान उद्योग व्यवसायात आहे.

संदर्भ:-


०१. व्यवसायिक उद्योगात- डॉ.संजय जोशी

०२. व्यसायिक उद्यागात- डॉ. आत्रेराव

०३. उद्योजकता विकास- प्रा.राईलेकर

०४. विकासात उद्योजकांचे योगदान- प्रा.गौतम भालेराव

०५. उद्योजकता विकास- जयंत जोशी


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

(23)

**Swami Ramanand Teerth Marathwada University Nanded &**

**NAGNATH ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE**

**AUNDHA NAGNATH DIST. HINGOLI (M.S.)**

Organise State Level Seminar

on

# "Digital Monetisation of Indian Economy"

## Certificate

This is to certifty that, Mr./Mrs./Dr./Prin. B. R. Shinde

of कै. रमेश वरपुडकर कॉलेज, सोनपेठ has participated/worked as a chairperson/ Resource Person/Member of organising committee and Presented the paper entitled भारताचा आर्थिक विकास व बेरोज...at one day State level seminar on "Digital Monetisation of Indian Economy" held on 11th Feb.2017 Organised by faculty of commerce Nagnath Arts,Commerce & Science College Aundha (N) Dist.Hingoli (MS).

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar College, Sonpeth Dist. Parbhani

**Dr. G.N. Bokare**
Convener

**Prin. Dr. V.S. Kanwate**
Organising Secretary

Sonpeth Pin-431516

# भारताचा आर्थिक विकास व बेरोजगारीची समस्या

डॉ.बी.आर.शिंदे
प्राध्यापक
के.रमेश वरपुडकर कॉलेज सोनपेठ

**प्रस्तावना :-**

भारत हा विकसनशील देश आहे, भारतामध्ये सध्या स्थितीत विकास हा प्रत्येक क्षेत्राचा होत आहे या साठी नियोजनाचा मार्ग भारतीय अर्थव्यवस्थेने स्विकारला आहे. आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी सर्वप्रथम देशातील उपलब्ध संसाधनाचा जास्तीत जास्त नियोजन बध्द वापर करुन आर्थिक विकास साधता येऊ शकतो त्यासाठी आपल्याला प्रथमिक, द्वितीय व तृतीय क्षेत्राच्या विकासावर भर देणे आवश्यक आहे जर विकसीत अर्थव्यवस्थेचा विचार केला तर देशाच्या विकासासाठी उद्योग क्षेत्र व सेवा क्षेत्रमध्ये वाढ होणे आवश्यक आहे. आर्थिक विकासाचा विचार करताना आपल्याला देशातील समस्याचा विचार केला पाहिजे, आर्थिक विकास करण्यासाठी आपल्या देशातील समस्या शोधून त्यावर उपाय योजना शोधल्या पाहिजेत त्यामध्ये बेरोजगारी ही एक महत्वाची ज्वलंत समस्य बनली आहे. बेरोजगारी ची समस्या सोडविण्यासाठी उपाय योजना शोधून त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली पाहिजे.

**संशोधनाची उदिष्टये :-**

१. बेरोजगारीची संकल्पना स्पष्ट करणे.
२. बेरोजगारी वाढीचा कारणे शोधने.

**अभ्यास पध्दती :-**

सादर शोध निबंध तयार करण्यासाठी प्रमुख्याने दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आलेला असून त्यामध्ये संशोधन विषयाचा अनुषंगाने प्रकाशित व अप्रकाशित लिखान,वर्तमानपत्रे,साप्ताहिके, मासिके, विविध अहवाल इंटरनेट इत्यादी साहित्याचा वापर करण्यात आला आहे.

**बेरोजगारीचीसंकल्पना अर्थ व व्याख्या :-**

१. प्रा.पिगु यांच्या मते रोजगार नसलेला परंतु रोजगार मिळावा अशी इच्छा असलेल्या व्यक्तीला बेरोजगार म्हणता येईल.
२. गिलीन व गिलीन यांच्या मते जेव्हा एखादी धडधाकट व्यक्ती आपल्या व कुटूंबाच्या चारितार्थासाठी निवडंचे साधन म्हणून अयोजन करु शकत नाही त्या परिस्थितीं ला बेरोजगारी म्हणतात.

बेरोजगारी हि भारतीय अर्थव्यवस्थेच्या नियोजना पुढील एक भयानक समस्या आहे मागील काही वर्षामध्ये या समस्याचे भयानक रुप धारण केले आहे. एक बाजूने लोकसंख्या जलद गतीने वाढत आहे तर दुसऱ्या बाजून शैक्षणिक सोयी सुविधामध्ये वाढ न झाल्यामुळे हि समस्या इतकी भयानक झाली आहे की आता आपन या समस्या विषयी विचार मंथन करु लागलो आहोत. या वेळी आपण अर्थव्यवस्थेमध्ये श्रमशक्ती व सुशिक्षित बेरोजगार दोघांही रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतील पध्दतीने उद्योग रचना व शैक्षणिक व्यवस्थेत बदल कारणे आवश्यक आहे. भारतातील

औद्योगीकरणाची गती कमी असल्यामुळे वाढत्या लोकसंख्येला औद्योगीकरणा पासून पूर्ण रोजगार निर्मीती होऊ शक्त नाही.

Sonpeth
Pin-431516

**बेरोजगारीची कारणे:-**

१. **नियोजनाचा अभाव :-**भारतामध्ये नियोजन १९५१ पासून सुरुवात झाली परंतू या मध्ये अनेक समस्या निर्माण होत आहेत नियोजन कार्यक्रमा मध्ये रोजगार निर्मितीला प्रधान्य देऊन तसे धोरण आखण्याचा पुरेशा प्रयत्न करण्यात आला नाही विशिष्ट कालमा नुसार रोजगार निर्मीतीचे उदिष्ट निश्चित करणे आवश्यक होत परंतु तसे उदिष्ट करण्यात आले नाही परंतु या प्रश्नाचा विचार न केल्यामुळे असा बेकारी किंवा बेरोजगारी हि एक भयानक समस्या बनली आहे.

२. **स्वंयरोजगाराच्या अपु-या सोयी :-** स्वयंम रोजगारातून मोठया प्रमाणावर रोजगार निर्मितीचे कार्य केले जाऊ शकते परंतु आपु-या सोयी मुळे स्वयंरोजगाराचा विकास किंवा विस्तार झालेला नाही. स्वयंम रोजगार सुरु करण्यासाठी प्रशिक्षणाची व्यवस्था उपलब्ध नाही तसेच चुकीची शैक्षणिक पध्दत या कारणामुळे बेरोजगारीची समस्या वाढत आहे व ती दिवसंन दिवस वाढतच जाणार आहे.

३. **सदोष शिक्षण पध्दती:-** शिक्षण पध्दती चुकीची असल्यामुळे आज रोजगार प्राप्तीच्या दृष्टीने कुचकामी ठरत आहे. अनेक तंज्ञाच्या मते बिंट्रीशानी घालून दिलेल्या कारकुनी शिक्षण व्यवस्थेत आपण आतातपर्यंत बदल करु शकलो नाहीत. आज देखील अनेक विद्यापीठात अर्टस,कॉमेस इत्यादी मधून लाखो विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडत आहेत परंतू उद्योग व्यापार व वित्त क्षेत्रातात त्याचे ज्ञान फारसे उपयुक्त पडत नाही त्यामुळे भारतीय शिक्षण पध्दती मनुष्य बळ विकासात अयशस्वी ठरली आहे.

**४.लोकसंख्या वाढ:-** लोकसंख्या हे एक मोठी समस्या बनली आहे कोणत्या देशाला स्वतःचा विकास साधयाचा असेल तर क्षेत्रफळा प्रमाणे लोकसंख्या मर्यादित असणे आवश्यक आहे परंतू भारताबाबत जर आपण पहिली तर लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा दुसरा क्रमांक लागतो तर चिनचा पहिला क्रमांक लागतो. जसा भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास होत आहे त्या प्रमाणात रोजगार व नौकरीच्या संधीत वाढ होत नाही व लोकसंख्याचा वाढीसोबत जेव्हा आपण रोजगार संधीची तुलना करतो त्या वेळी असे लक्षात येते की अत्यंत अल्प अशी वाढ रोजगार मध्ये होत आहे.

**५. शैक्षणीक मागासलेपणा:-** देशातील शिक्षण हे आज ही काही प्रमाणात मागसलेलेच आहे, कारण की काही प्रमाणात शैक्षणीक पध्दतीत खुप सा-या आडचणी असल्यामुळे शैक्षणीक क्षेत्राचा विकास फार मोठया प्रमाणावर झालेला नाही, त्यामुळे याचा रोजगारावर परिणाम होत आहे ज्या पध्दतीचे विद्यार्थी किंवा रोजगार अर्थव्यस्थेला पाहिजे तशा स्वरुपाचे विद्यार्थी घडवले जात नाहीत त्यामुळे बेकारी किंवा बेरोजगारी खुप मोठया प्रमाणावर वाढलेली आहे.

**६.उदयोग धंदयाशी मुलभुत सुविधेचा अभाव:-** हे एक महत्वाचे कारण सांगता येईल की उद्योग व्यवसाय यामुळे खुप मोठया प्रमाणावर रोजगार निर्माण होत जर अर्थव्यवस्थेला विकास साध्याचा असेल तर त्या अर्थव्यवस्थेतील उद्योग क्षेत्र व सेवा क्षेत्र यांचा विकास होणे आवश्यक असते परंतू अर्थव्यवस्थे मध्ये जर उद्योग क्षेत्राचाविकास झाला नाही तर रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत उद्योग धंदयाच्या विकासाठी त्यांना पोषक वातावरण निर्माण करण्याची गरज असेल त्यामध्ये उद्योगाना स्वताःच्या विकासासाठी शासनाने

विविध सुविधा वेळोवेळी द्यावात तसेच विकासभुमूख योजना राबवणे आवश्यक आहे व त्यांना विविध कर सवलती दिल्या गेल्या पाहिजेत. त्यामध्ये रास्ते कच्या माल,वीज,पाणी इत्यादी सुविधा पुरविल्या पाहिजेत त्यामुळे उद्योगाचा विकास झपाटयाने होत व रोजगार मोठया प्रमाणावर निर्माण होते आणि बेरोजगारीची समस्या काही प्रमाणात दुर केली जाऊ शक्ते.

**७.भांडवलाचा अभाव :-** रोजगार निर्मीतीसाठी उद्योग व्यवस्था हे एक चांगले साधन आहे. व्यवसाय सुरु करण्यासाठी भांडवलाची गरज आसते . व्यवसाया मधून मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिण होतो व बेकारीची समस्या काही प्रमाणात कमी केली जाऊ शक्ते परंतू भारतीय लोकाकडे भांडवल उपलब्ध नसल्यामुळे ते व्यवसाय निर्मीण करत नाही तसेच भांडवल उपलब्ध करुण देणा-या संस्था ही त्यांना पुरेशा प्रमाणात भांडवल निर्मीती करुत देत नाही. तसेच भांडवलाची समस्या सोडवण्यासाठी काही व्यवसायीक खाजगी संस्थकडून किंवा लोका कडून कर्ज घेतात त्याच्या कर्जचा दर जास्त अल्यामुळे त्यांना व्यवससयात तोटा होतो व बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे.

**८.प्रशिक्षणाचा अभाव :-** कोणता हि उद्योग व्यवसाय करण्यासाठी प्रशिक्षण देण्याची गरज असते प्रशिक्षण आणि व्यवसाय बंद पडतात त्यामुळे वेळेवर व योग्य प्रकारे मिळणे आवश्यक असते परंतु जर आपण विचार केला तर आपल्या देशामध्ये प्रशिक्षण देणा-या संस्था या मोठया प्रमाणावर नाहीत व योग्य प्रकारे प्रशिक्षणाची व्यवस्था किंवा सुविधा नसल्यामुळे व्यवसाय उद्योग विकसीत होऊ शकले नाहीत व त्यामुळे रोजगारावर परिणाम झाला असून बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे.

**९.शेती क्षेत्रामध्ये आधुनिकतेचा आभावः-** भारतामध्ये शेती व्यवसायाचा विकास झालेला नाही आजही पारंपारीक पध्दतीने शेती व्यवसाय केला जाती व शेती व्यवसाय विकसीत करण्यासाठी सरकारने शेतक-यांना आधुनिक शेती उपकरणे उपलब्ध करुन घ्यावी व शेती व्यवसाय करण्यासाठी प्रशिक्षण द्यावे ज्यामुळे शेतकरी शेती व्यवसाय चागंल्या पध्दतीने करतील व रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणावर उपलब्ध होतील व बेरोजगारीची समस्या काही प्रमाणात सुटेल.

**१०.अविभक्त कुटूंब पध्दती :-** ग्रामीण भागात काही भागामध्ये आजही मोठया प्रमाणात अविभक्त कुटूंब पध्दती आहे. कुटूंबामध्ये कर्ता एक जन असतो व त्यावर बाकीबचे लोक न काम करता बसुन असतात व त्यांना संरक्षण दिले जाते. तसेच त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा भगवल्या जातात त्यामुळे बेरोजगारी निमर्ण होत आहे.

**निष्कर्ष :-**

बेरोजगारी हि एक समाजाला लागलेली कीड आहे जर याचा समुळ नाश करण्याचा असेल तर शासन व समाज यांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. यासाठी वरील उल्लेख केलेल्या सर्व कारणावर योग्य उपाय योजना शासनाने शोधावी व बेरोजगारीची समस्या समुळ नष्ट करावी. वरील कारणामुळे खुप मोठया प्रमाणावर बेरोजगारी निर्मिण होत आहे.

संदर्भ ग्रथ सुची :-


१. डॉ.रावसाहेब जाधव पारवेकर, भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास विषयक समस्या,मित्र प्रकाशन.
२. भारतीय अर्थव्यवस्था = डॉ.सोळंखे
३. दैनिक लोकसत्ता =
४. भारतीय अर्थव्यवस्था = रंजन कांबळे.



PRINCIPAL